संपादकीय

# दिवाळीची धामधूम संपली आता निवडणुकांची रणधुमाळी




दिवाळी सण हा मोठ्या आनंदात उत्सवात सर्वत्र साजरा झाला या दिवाळीच सणाच्या अनेक राजकीय कार्यकर्त्यांनी आपापल्या प्रभागात प्रभागातील नागरिकांपर्यंत दिवाळीच्या शुभेच्छा अनेक प्रकारे अनेक माध्यमातून पोहोचविल्या निमित्त एकच नगरपालिका व महानगरपालिका च्या निवडणुका येत्या दोन ते तीन महिन्यात होणार भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना, कॉंग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी व ठाकरेंची शिवसेना व छोटे-मोठे सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या तसेच राजकीय नेत्यांच्या वतीने लहान मोठ्यांपर्यंत दिवाळीच्या शुभेच्छा पोहोचविण्यात आल्या. आता दिवाळी संपली, आता राजकीय निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरु होणार यामध्ये प्रत्येक राजकीय पक्ष हे दुसऱ्या विरोधी पक्षांवर आरोप प्रत्यारोप करणार प्रत्येक इच्छुक उमेदवार हाआपलाच पक्ष कसा उत्तम व आपलेच काम कसे चांगले हे दाखविण्याचा प्रयत्न करणार, तसेच प्रभागातआपणच कसे चांगले काम करणारे नेते असल्याबद्दलचे सांगत फिरणार, येत्या काही दिवसातच आरक्षण जाहीर होणार आहेत या आरक्षण जाहीर झाल्यानंतर पन्नास टक्के महिला या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. पिंपरी चिंचवड शहराचा विचार केला तर पिंपरी चिंचवड शहरात 128 नगरसेवक निवडून येणार आहेत, 128 नगरसेवकांच्या जागेच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी हजारो उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत यामध्ये 50% महिलाही आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या एकूण 128 जागांपैकी 50 टक्के जागा या महिलांसाठी आरक्षित आहेत, एकूण 64 जागा महिलांसाठी आरक्षित असणार आहेत. त्यातील अनुसूचित जातीसाठी एकूण 20 जागा आणि अनुसूचित जमातींसाठी तीन जागा राखीव असणार आहेत, इतर मागास वर्गासाठी (ओबीसी) 35 जागा आरक्षित असणार आहेत तर सर्वसाधारण महिलांसाठी (खुला) एकूण 35 जागा राखीव असणार आहेत असे तब्बल 93 जागेवर आरक्षण असणार आहे. खुल्या गटातील उमेदवारांना केवळ 35 जागा उपलब्ध असणार आहेत. खुल्या गटातून अनेक प्रबळ व सक्षम माजी नगरसेवक पदाधिकारी व इच्छुक आहेत त्यांनी निवडणूक मैदानाची तयारी सुरु केली आहे. इच्छुकांची मोठी संख्या लक्षात घेता खुल्या गटातील जागेवर मोठी रस्सीखेच दिसून येणार आहे. त्यावर तोडगा काढताना प्रत्येक राजकीय पक्ष श्रेष्ठींना खूपच मेहनत करावी लागणार या शंका नाही.

महानगरपालिकेच्या निवडणुकी करीता हे आरक्षण जाहीर झाल्याबरोबर निवडणुकीचे फटाकडे बॉम्ब उडतील प्रत्येकाचा प्रचार सुरु होईल, प्रत्येक उमेदवार आपापल्या प्रभागात नागरिकांच्या घरी जाऊन भेटीगाठी वाढवेल काय नको, काय हवं याची काळजी घेईल प्रत्येक राजकीय पक्षाचे नेते हे शहरात सर्वे करतील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतील आणि या मुलाखतीतून योग्य उमेदवार निवडतील व निवडणूक रिंगणात पक्षाच्यावतीने उमेदवारी देऊन निवडणूक लढवतील. त्यामुळेच लेखाच्या पहिल्या ओळीतच आता दिवाळी संपली आता निवडणुकीची रणधुमाळी सुरु होईल असे अधोरेखित करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक ही 2017 च्या प्रभाग रचनेनुसार होणार आहे. दिवाळीनंतर म्हणजेच आता दोन ते तीन महिन्यानंतर होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत नगरसेवकांची एकूण 128 संख्या असणारा असून जाहीर केलेल्या प्रभाग रचनेत एकही जागा वाढविण्यात आलेले नाही तसेच 2011 च्या जनगणनेनुसार ही निवडणूक होत आहे.

त्यामुळे नगरसेवक संख्येत वाढ करण्यात आली नसल्याचे निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर त्यात कोणाला कोणती जागा सुटते यावरून त्या इच्छुक उमेदवाराचे भवितव्य ठरणार आहे त्यामुळे सर्वच इच्छुक उमेदवारांच्या नजरा आरक्षण सोडतीकडे लागले आहेत.

# कै.मनिषा भाऊसाहेब भोईर ट्रस्ट आयोजित 'सुरमयी दिवाळी पहाट' कार्यक्रम मोठ्या उत्साहात

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

**चिंचवड : प्रकाशाच्या लखलखाटात आणि आनंदाच्या उत्सवी वातावरणात चिंचवड परिसरातील रसिक संगीतप्रेमींची दिवाळीची पहाट यंदा अविस्मरणीय ठरली. भोईर नगर येथील मनिषा स्मृती निवास येथे मा. नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांच्या निवासस्थानी कै. मनिषा भाऊसाहेब भोईर ट्रस्ट आणि परिवार यांच्या वतीने सालाबादप्रमाणे आयोजित 'सुरमयी दिवाळी पहाट' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**




संगीताच्या रेशमी तारा, सुरांच्या लहरी आणि तालवाद्यांच्या झंकाराने अवघे वातावरण भारले गेले होते. 'सूर निरागस हो...' या लोकप्रिय भावगीताने या सुरेल सोहळ्याची मंत्रमुग्ध करणारी सुरुवात झाली.

या सुरेल सोहळ्यात संगीताच्या रेशमी तारा, सुरांच्या लहरी आणि संगीताच्या स्वरांनी रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. गायक वादकांनी रसिकांच्या मनांवर आपल्या शब्दसुरांनी लहर सोडली. त्यानंतर बंदिशी वादनांनी कार्यक्रमाला गोडवा आणला, तर, अभंग आणि भक्तिगीतांनी उपस्थितांची मने भक्तिरसाने ओथंबली,

'सूर निरागस हो...' या भावगीताने अजिंक्य देशपांडे यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. मधुसुदन ओझा यांनी 'विठ्ठल आवडी प्रेम भावे' आणि 'मोरया' भार्गव जाधव यांनी 'विठू कैवल्याचा' पियुष भोंडे यांनी 'विठ्ठला तू वेडा कुंभार' तसेच 'आली ठुमकत नार' हि गीते सादर करत भक्तीमय वातावरण निर्माण केले. तबल्यावर तेजस जाधव यांनी साथ दिली. मानसी भोईर घुले व भाऊसाहेब भोईर यांचे 'प्रीतीचा झुळ झुळ पाणी', तसेच अमोल यादव व कोमल यादव यांचे 'अश्विनी येना', आणि सार्थक भोसले व मानसी भोसले यांचे 'मधुमास नवा' तसेच अजिंक्य देशपांडे व पियुष भोंडे यांच्या 'शिर्डीवाले साई बाबा' या द्वंद्वगीतांना रसिकांची विशेष दाद मिळाली.

सॅक्सोफोन वादक पियुष तिवारी यांनी 'गुलाबी आंखे' हे इन्स्ट्रुमेंटल सादर केले. तसेच, पियुष तिवारी आणि सचिन वाघमारे यांनी बासरी आणि सॅक्सोफोनची मनमोहक जुगलबंदी सादर केली. या संपूर्ण कार्यक्रमाला वाद्यवृंदाच्या मांदियाळीने अप्रतिम रंग चढवला. सुनील जाधव (कीबोर्ड), सचिन वाघमारे (बासरी), पियुष तिवारी (सॅक्सोफोन), प्रवीण जाधव (ऑक्टोपॅड / रिदम मशीन), प्रमोद शेंडगे (पखवाज, ढोलक, ढोलकी) आणि चंद्रशेखर गायकवाड (तबला / काँगो) यांनी आपल्या वादनकौशल्याने कार्यक्रमाची उंची वाढवली. ध्वनी संयोजन फिरोज रमजानी यांनी केले होते. शेकडो रसिक संगीतप्रेमींनी उपस्थित राहून या कार्यक्रमाला दाद दिली. संगीत आणि आनंदाच्या या अभ्यंगस्नानाने चिंचवड परिसरातील नागरिकांची दिवाळीची पहाट अविस्मरणीय झाली.

# वाकडमध्ये दिवाळीची सुरेल रात्र:

## गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल आवाजात रंगला 'लाईव्ह इन कॉन्सर्ट'



➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक राहुल कलाटे आयोजित वाकड व परिसरातील नागरिकांनी एक अविस्मरणीय संगीत-गीत संध्या अनुभवली. प्रख्यात गायिका बेला शेंडे यांच्या मधुर सुरांनी सजलेला 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' व दिवाळी फराळ कार्यक्रम येथील कै. तानाजीभाऊ तुकाराम कलाटे उद्यानात मोठ्या उत्साहात पार पडला.

संध्याकाळी प्रकाशझोतांत आणि फुलांच्या सजावटीत न्हालेल्या कलाटे उद्यानात वाकड आणि परिसरातील नागरिकांची कुटुंबियांसमवेत गर्दी उसळली होती. बेला शेंडे, सहकारी गायक व वाद्य

वृंदांच्या साथीने एकशे बढकर एक गाण्यांनी सजलेली ही दिवाळीची रात्र सर्वांच्या मनात कायमची घर करून गेली. यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या उस्फुर्त प्रतिसादात दिवाळी फराळ आणि सांगितीक मेजवानीच्या अनोख्या सोहळ्याचा मनमुराद आस्वाद नागरिकांनी घेतला.

आयोजक राहुल कलाटे या प्रसंगी बोलताना म्हणाले, परिसरातील नागरिकांनी दिवाळीच्या शुभमुहूर्तावर कुटुंबासह आनंदाचा व सांस्कृतिक अनुभूतीचा सोहळा अनुभवावा, यातून विचारांची देवाण-घेवाण व्हावी, स्नेह-ऋणानुबंध आणखी वृंद्धीगत व्हावेत या हेतूने ह्या सोहळ्याचे आयोजन केले आहे. शिट्ट्या आणि टाळ्यांच्या कडकडाटात बेला शेंडे यांनी सादर केलेल्या आता वाजले की बारा ह्या तुफान लावणीने कार्यक्रमाची सांगता झाली. शेवटी फटाक्यांच्या आतषबाजीत आकाश उजळून निघाले होते.

वन्समोर आणि टाळ्या-शिट्ट्यांची साद

बेला शेंडे यांनी "कह दो ना तुम मुझे भूल गए हो...",

"पिया बासे रे मोरे नयना में", "मन उधाण वाऱ्याचे" अशा सुरेल गाण्यांमधून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. मंगलास्टक वन्स मोरमधील गुण गुणावे गीत सारे, मला वेड लागले प्रेमाचे, मुंबई-पुणे-मुंबईतील कधी तू आणि का कळेना, टाईमपासमधील धुंद कळ्यांना वेलींना या गीतांसह राती अर्ध्या राती, आता वाजले की बारा ह्या लावणीला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेत ठेका धरला. वन्समोर आणि टाळ्या-शिट्ट्यांच्या

कडकडाटात परिसर दणाणून गेला होता.

# पुणे महानगरपालिकेची कनिष्ठ अभियंता पदे भरणार



➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : पुणे महापालिकेत कनिष्ठ अभियंता ( वर्ग 3) साठी भरती केली जाणार आहे. यामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना महापालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी नोकरी उपलब्ध होणार आहे. या पदांसाठी महापालिकेने यापूर्वीच जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, या जाहिरात पदासाठी काही नवीन सामाजिक व समांतर आरक्षण प्रवर्गांतील जागा उपलब्ध झाल्याने या पदांसाठी पालिकेने सुधारित जाहिरातीनुसार पदभरती करण्याचा निर्णय घेतला आहे.


ही भरती स्थायी पदांसाठी असून निवड झालेल्या उमेदवारांना कायमस्वरुपी महापालिकेच्या सेवेत सामील होता येणार आहे. महापालिकेने यापूर्वी देखील अभियंता पदांसाठी भरती प्रक्रिया केली होती. मात्र, निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे काहीवेळा ही प्रक्रिया रखडली होती. यावेळी ही भरती प्रक्रिया कोणत्याही आचारसंहितेच्या काळात अडकणार नाही, याची काळजी घेतली आहे.यासाठी इच्छूक उमेदवारांना येत्या 31 ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे, अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी दिली.

राज्य शासन निर्णय दि. 27 फेब्रुवारी 2024 नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गासाठी 10 टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे पदसंख्या वाढवून नव्याने सुधारित आरक्षण रचना जाहीर करण्यात आली आहे.

सुधारित जाहिरातीत काही नवीन सामाजिक व समांतर आरक्षण प्रवर्गातील जागा उपलब्ध झाल्याने इच्छुक उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. इच्छुकांनी 31 ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भरदिवसा घरफोडी करणारा चोरटा गजाआड

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप




पुणे : रास्ता पेठ भागात भरदिवसा घरफोडी करुन पसार झालेल्या चोरट्याला समर्थ पोलिसांनी अटक केली. चोरट्याकडून दोन तोळ्याची सोनसाखळी, एक तोळ्याची सोनसाखळी असा ऐवज जप्त करण्यात आला.शिवाजी रामचंद्र खंडागळे (वय 29, रा. छत्रपती संभाजीनगर, सांगलीवाडी, मिरज, जि. सांगली) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका महिलेने समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

धनत्रयोदशीच्या दिवशी (18 ऑक्टोबर) तक्रारदार महिलेने कपाट उघडले. तेव्हा कपाटात ठेवलेली 50 हजारांची रोकड, दोन तोळ्याची सोनसाखळी, एक तोळ्याची सोनसाखळी असा ऐवज लांबविण्यात आल्याचे लक्षात आले. या घटनेनंतर महिलेने समर्थ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार केली. त्यानंतर समर्थ पोलिसांच्या पथकाने तपास सुरु केला. तपासात मिळालेल्या माहितीनुसार, सराइत चोरटा खंडागळेला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत खंडागळे सराइत चोरटा असल्याची माहिती मिळाली. त्याने सोलापूर शहरात घरफोडीचा गुन्हा केल्याची माहिती मिळाली. त्याच्याविरुद्ध सोलापूर शहरातील फौजदारी चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस उपायुक्त ऋषीकेश रावले, सहायक आयुक्त अनुजा देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, गुन्हे शाखेचे निरीक्षक चेतन मोरे, उपनिरीक्षक जालिंदर फडतरे, संतोष पागार, रोहिदास वाघेरे, इम्रान शेख, शिवा कांबळे, अमोल गावडे, शरद घोरपडे, भाग्येश यादव यांनी ही कामगिरी केली.

# पिंपरीत चॉइसच्या वाहन क्रमांकाचे आकर्षण!

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप




पिंपरी : पसंतीच्या (चॉइस) वाहन क्रमांकाबाबतचे वाढते आकर्षण राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत ठरत आहे. जानेवारी 2025 पासून 15 ऑक्टोबरपर्यंत पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाला पसंतीच्या क्रमांकाच्या माध्यमातून 37 कोटी 31 लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे.

दुचाकी, चारचाकीला आपला आवडता क्रमांक, जन्मतारीख, लग्नाची तारीख किंवा एखाद्या आनंदाच्या घटनेची तारीख असावी, याकडे वाहनचालकांचा कल वाढला आहे. पसंतीच्या नंबरसाठी मोठी स्पर्धा असते. राज्य सरकारने सन 2024 मध्ये पसंतीच्या नंबरच्या शुल्कात दुपटीने वाढ केली.त्यानंतरही स्वतःच्या वाहनांना आवडता क्रमांक घेण्याची स्पर्धा कमी झाली नसून यामध्ये दिवसेंदिवस वाढच झाली आहे. चार चाकी वाहनांसाठी 0001 नंबरसाठी सहा लाख रुपये शुल्क आकारले जाते, तर पूर्वी ते तीन लाख होते. दुचाकी वाहनांसाठी शुल्क दुप्पट झाले आहे.

जानेवारी, मार्च आणि ऑगस्ट या महिन्यांत पसंतीच्या नंबरचा चार कोटींपेक्षा अधिक महसूल जमा झाला असून, सप्टेंबर महिन्यात सर्वाधिक पाच कोटींवर महसूल जमा झाला आहे.

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाने मागील साडेनऊ महिन्यांत पसंतीच्या नंबरच्या विक्रीतून 37 कोटी 31 लाख 82 हजार 500 रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. ही कमाई मुख्यत: 0001, 9999 सारख्या लोकप्रिय नंबरच्या बोलीमुळे झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले

# पुण्यात 10 म्युझिक व्हिडिओ आणि एका वेब सिरीजची घोषणा



➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : मराठी मनोरंजन विश्वात नव्या अध्यायाची सुरुवात करत सुर्या मिडीया प्रोडक्शन तर्फे द ग्रॅंड प्रोजेक्ट घोषणा आणि दिवाळी सेलिब्रेशन हा भव्य सोहळा हॉटेल प्राईड प्रिमियर, पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या विशेष कार्यक्रमात सुर्या मिडीया प्रोडक्शनचे संस्थापक, निर्माते-दिग्दर्शक ओंकार हनुमंत माने यांनी तब्बल 10 म्युझिक व्हिडिओ अल्बम्स आणि 1 वेब सिरीज अशा एकूण 11 प्रोजेक्ट्सची घोषणा एकाच मंचावर केली. जे मराठी चित्रपटसृष्टीसाठी एक अभूतपूर्व आणि प्रेरणादायी पाऊल ठरले आहे. -या कार्यक्रमाचे मान्यवर उपस्थित पाहुणे : संदीप मोहिते पाटील – मराठी चित्रपट निर्माते, आनंद पिंपळकर – सुप्रसिद्ध वास्तुतज्ञ व निर्माते, मेघराज राजे भोसले – अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, राहुल ओदक – तेलुगू व मराठी चित्रपट निर्माते, सौजन्य निकम – मराठी चित्रपट निर्माती, पूर्वा शहा – अभिनेत्री व निर्माती, नितीन टाकळकर – सुप्रसिद्ध व्यावसायिक, तुषार शेलार – दिग्दर्शक आदी उपस्थित होते. याप्रसंगी . "मी एकनाथ" या वेब सिरीज ची कथासूत्र: प्रेरणादायी पोलीस कॉन्स्टेबल एकनाथ शिंदे यांच्या जीवनावर आधारित कथा आहे. यामध्ये आनंद पिंपळकर, नवोदित अभिनेता चेतन रहाणे व मराठीतील काही दिग्गज कलाकार काम करत असून ओंकार हनुमंत माने यांनी दिग्दर्शन केले आहे. या वेब सिरीज व्यतिरिक्त - माहोल मुली, होनेवाली वाईफ, ठिणगी, मराठी पोरी, पैंजण, गावभर बोभाटा, दाजी जरा ऐका, मधाळ, जिव्हार तू आणि पाखरू अश्य दहा म्युझिक व्हिडिओ अल्बम्सची घोषणा ही करण्यात आले.

या सोहळ्यात 11 प्रोजेक्ट्सच्या अनावरणाबरोबरच यावेळी पत्रकारांचा सन्मान करित दिवाळी उत्सव साजरा करण्यात आला.

मराठी मनोरंजन क्षेत्रातील नव्या युगाची सुरुवात म्हणून हा सोहळा ओंकार माने यांच्या कारकिर्दीतील एक ऐतिहासिक टप्पा ठरला. याप्रसंगी ओंकार माने म्हणाले की, ही सगळी कामं म्हणजे एक स्वप्न, एक विश्वास... ज्यात भावना, मनोरंजन आणि मराठी मातीचा आत्मा आहे. या लाँच सोहळ्याला प्रसिद्ध अभिनेता विशाल फाले, अभिनेत्री राधा सागर, प्रणव पिंपळकर, प्रणव जाधव, अनाहिता कपूर, तसेच "मी एकनाथ" वेब सिरीजमधून झळकणारा नव्या दमाचा अभिनेता चेतन राहणे उपस्थित होते.

# रवींद्र धंगेकरांचा मोहोळांवर निशाणा!

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप



पुणे - पुणे विद्येचे माहेर घर आहे. इथं ज्या संस्थेकडून गोरगरिब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळते, तिथली संस्कृती महावीरांना गहाण ठेवण्यापर्यंत नेली आहे. मी भाजपाविरोधात नाही, विकृतीविरोधात बोलतोय असं सांगत शिंदेसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांनी पुन्हा एकदा मुरलीधर मोहोळ यांच्यावर आरोप केले आहेत.

रवींद्र धंगेकर म्हणाले की, हा पक्ष शिवसेनाप्रमुखांचा आहे. सत्ता जर जनतेच्या कामाच्या आड येत असेल तर सत्ता बाजूला ठेवा आणि तुम्ही जनतेच्या कामासाठी रस्त्यावर उतरा असं बाळासाहेब ठाकरे म्हणायचे. त्यांच्या कुशीत तयार झालेले एकनाथ शिंदे आहेत. त्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेले काम आम्ही करतोय. सर्व शिवसैनिक आणि पुणेकर माझ्या पाठीशी ठाम आहेत त्यामुळे मी लढतोय असं त्यांनी सांगितले.

तसेच शहरात गुन्हेगारी वाढत असेल, त्यांची सवय बदलत नसेल तर त्यांच्यावर अंकुश टाकलाच पाहिजे. जर अंकुश नाही टाकला तर बिल्डरांची, गुन्हेगारांची ही भाजपा होईल. ज्यावेळी जैन बोर्डिंग प्रकरण उघडकीस आले, तेव्हा त्या त्या वेळी ते दडपण्याचा प्रयत्न झाला. जैन समाजातील काही लोकांची तोंडं बंद करण्यात आली. ही सगळे होत असताना एक पुणेकर म्हणून मला हे बघवले नाही. त्यामुळे रस्त्यावर आलेच पाहिजे. किती जणांची तोंडे बंद करणार, माझे तोंड बंद करणे इतके सोपे नाही असा टोलाही धंगकेरांनी लगावला आहे.

दरम्यान, पुण्यात जे घडतंय ते संपूर्ण महाराष्ट्र बघतोय.

ज्या प्रवृत्तीने महावीरांना गहाण ठेवले त्याविरोधात बोलायला हवे. आम्ही विकृतीविरोधात लढतोय. पुण्यात 70-80 टोळ्या कार्यरत आहेत. रोज सर्वसामान्यांना मार खावा लागतो. बिल्डरलॉबी शासकीय यंत्रणा धाब्यावर ठेवत आहेत. माझ्या विचारांना एकनाथ शिंदे पाठिंबा देतील.

भाजपामधील गतीमान विकृतीविरोधात मी आहे.मी भाजपाच्या इतर नेत्यांविरोधात बोललो का, ती माणसे विचारांची लढाई लढत होते.

परंतु आता बिल्डरांची बाजू घेऊन जनतेशी भांडणारे नेते आलेत. एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांच्या पाठीशी आहे. भाजपामधील काही लोक मला सपोर्ट करत आहेत. काही नेत्यांची तोंड दाबून बुक्क्याचा मार खावा लागत आहे असंही रवींद्र धंगेकरांनी म्हटलं.

# पुण्यातील एनडीएमध्ये 18 वर्षीय तरुणाचा मृत्यू

पुणे : पुण्याच्या एनडीएमध्ये 18 वर्षीय तरुणाची तलावात पोहताना मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आदित्य यादव (वय 18) असे या तरुणाचे नाव आहे. हा नालंदा (बिहार) येथील असून राष्ट्रीय संरक्षण अकादमीचा (NDA) पहिल्या बॅचमधील विद्यार्थी होता. काल संध्याकाळी अंदाजे चार ते पाचच्या दरम्यान प्रशिक्षण सत्रादरम्यान 21 मीटर फ्लोटिंग सराव करत असताना ही दुर्दैवी घटना घडली. आदित्य हा तरुण 50 बाय 21 मीटर आकाराच्या पोहण्याच्या तलावात 21 मीटर फ्लोटिंग सराव करत होता. यावेळी त्याची हालचाल अचानक बंद झाली. हे पाहून दोन्ही बाजूंना उपस्थित असणाऱ्या सुरक्षा रक्षक आणि प्रशिक्षक यांनी तातडीने त्याला पाण्यातून बाहेर काढले. त्याला हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन (CPR) दिले.परंतु तो शुद्धीवर आला नाही. त्याला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सहाय्यक पोलिस निरीक्षक अतुल क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरु आहे. या दुर्दैवी घटनेमुळे एनडीए परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.